# महाराष्ट्र विधानसभा

**चौथे अधिवेशन, २०२२**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (जि.पुणे) येथील कोंढवे-धावडे ग्रामपंचायत हद्दीमध्ये हरित क्षेत्रात होत असलेली बेकायदा वृक्षतोड

**(१) १६३ (२१-०३-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (जि.पुणे) येथील कोंढवे-धावडे ग्रामपंचायत हद्दीमध्ये हरित क्षेत्रात बेकायदा वृक्षतोड होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्याचे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी बेकायदा वृक्षतोड होत असतांना महानगरपालिका आणि पीएमआरडीए प्रशासनाच्या हद्द वादामुळे वन विभाग कामगारामार्फत कुऱ्हाड व कटरच्या सहाय्याने झाडे तोडून वेगाने सपाटीकरण करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वृक्षसंपदेची हानी रोखण्याच्या दृष्टीने तसेच याकडे संबंधित प्रशासनाचे होत असलेल्या दुर्लक्षाबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-१२-२०२२) :** (१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामधील आवक नोंदवहीनूसार कुठल्याही बेकायदेशीर वृक्षतोड बाबत तक्रार आढळून येत नसल्याचे प्राधिकरणाने कळविले आहे.
(२) पुणे महानगरपालिका व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे मध्ये हद्दीचा वाद चालू नाही. तसेच प्राधिकरणाने सदरच्या प्रश्नाबाबत दि.०६.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये वन विभागासही कार्यवाही करण्यास कळविले आहे.
(३) वृक्षसंपदेची हानी रोखण्यासाठी प्राधिकरणाने वृक्ष प्राधिकरण समितीची स्थापना केली आहे. त्यामुळे शासनाकडून कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन तातडीने अदा करण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याबाबत

**(२) ३२४०७ (१५-०९-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागांच्या अखत्यारित येणाऱ्या राज्यातील ५१ समाजकार्य महाविद्यालयातील ५५९ शिक्षक व ७०८ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन गत तीन महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे दिनांक २६ जुलै, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन तातडीने अदा करण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-११-२०२२) :** (१) नाही, हे खरे नाही
(२) प्रश्न उद्भवत नाही
(३) लागु नाही

---

**अहमदपूर (जि.लातूर) येथील लाभार्थी रमाई आवास योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याबाबत**

**(३) ३३०५२ (१२-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) पंचायत समितीने रमाई आवास योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्यांना ड पत्रकांमध्ये नाव असण्याची जाचक अट घातल्यामुळे गरजूंना या योजनेपासून वंचित राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जाचक अट तात्काळ रद्द करावी अन्यथा या संदर्भात बहुजन आघाडीच्या वतीने अहमदपूर पंचायत समितीच्या समोर धरणे-आंदोलन सुरु केले जाईल असा इशारा माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही अट रद्द करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, दि.३०.०९.२०१६ अन्वये रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थी निवडीसाठी शासनाने पुढीलप्रमाणे निकष निश्चित केले आहेत:-

अ) सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC-२०११) प्राधान्यक्रम यादीच्या (Generated Priority List) निकषाबाहेरील असावा. कारण प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण (PMAY-G) लाभार्थी निवडीसाठी सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC-२०११) प्राधान्यक्रम यादीतून (Generated Priority List) निवडण्यात येणार आहेत.

ब) तसेच, शासन शुद्धीपत्रक दिनांक ०८.१२.२०१७ अन्वये सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC-२०११) च्या प्रपत्र "ड" मध्ये असलेले अनुसूचित जाती तथा नवबौद्ध लाभार्थी जे रमाई आवास योजनेचे (ग्रामीण) अद्ययावत निकष पूर्ण करत असतील, रमाई आवास घरकुल (ग्रामीण) या योजनेत लाभार्थी म्हणून पात्र असतील असे निर्देश आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा दि.१२.०८.२०२१ मध्ये झालेल्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दि.३०.०९.२०१६ अन्वये रमाई आवास योजनेंतर्गत निवड करण्यात येणारा लाभार्थी सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC-२०११) प्राधान्यक्रम यादीच्या (Generated Priority List) निकषाबाहेरील असावा. कारण प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण (PMAY-G) लाभार्थी निवडीसाठी सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC-२०११) प्राधान्यक्रम यादीतून (Generated Priority List) निवडण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील मनोर ते वाडा बायपास मार्गाचे काम त्वरीत सुरु करण्याबाबत**

**(४) ३४८९२ (१७-०१-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील नागरिकांसाठी अतिशय महत्वपूर्ण प्रकल्प असणारा मनोर-वाडा बायपास महामार्गाचे काम अद्यापपर्यंत प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास मनोर ते वाडा बायपास मार्गास लवकरात लवकर मंजुरी मिळणे तसेच सदरचा मार्ग बनविण्याकरिता संबंधित अधिकाऱ्यांसमवेत एक संयुक्त बैठक आयोजित करणेबाबत स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२० रोजी सार्वजनिक बांधकाम मंत्री, (सा.उ.वगळून) यांस निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-११-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) अध्यक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे अध्यक्षतेखाली दि. २५ मे, २०२१ रोजी पार पडलेल्या बैठकीत मनोर ते वाडा ते भिवंडी या खाजगीकरणांतर्गत मंजूर रस्त्यामधील विश्वभारती फाटा ते भिनार वडपे या बाह्य वळण रस्त्याच्या भागाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यास अनुसरून सदरहू कामाबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फ़त सार्वजनिक बांधकाम विभागाच्या समन्वयाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## वाघोली (ता.हवेली, जि.पुणे) येथील रस्ता रुंदीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(५) ३६४६२ (०२-०२-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पुणे-नगर महामार्गावरील वाघोली (ता.हवेली, जि.पुणे) येथील वाहतुक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी रस्ता रुंदीकरणाचे कामास तीन वर्षापूर्वी मंजूरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाघोली मध्ये एका ग्रामपंचायत पदाधिकाऱ्याने त्याच्या हद्दीत काम करून देण्यास नकार दिल्याने सदर रस्त्याचे काम अडीच वर्षापासून बंद असल्याचे दिनांक १० सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निर्दशनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पाचे ८० टक्केपेक्षा अधिक भूसंपादन झाल्याशिवाय कामाची वर्क ऑर्डर देता येत नसताना नियम डावलून ठेकेदार कंपनीला वर्क ऑर्डर दिली तसेच रस्त्यावर खड्डे, साईड पटटयांवर राडारोडा मोठया प्रमाणावर पडला असल्याचेही त्या समुारास निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ठेकदार कंपनीने प्रत्यक्षात किती रक्कमेचे काम केले आहे व त्यापोटी ठेकेदारास किती रक्कम अदा करण्यात आली आहे ,
(५) असल्यास, सदर रस्ता प्रकल्पाचे काम पुन्हा सुरु करण्याबाबत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण वा शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) नाही, हे खरे नाही,
(३) हे खरे नाही, प्राधिकरणाने हाती घेतलेले काम साखळी क्र. १३/८०० ते १५/१०० या १३०० मी. लांबीत असून, सदर लांबीत काम करण्यास ग्रामपंचायत पदाधिकाऱ्याने नकार दिल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि, सदर लांबीत उपलब्ध रुंदीतच (रॉ) काम करावयाचे असल्याने भूसंपादनाचा प्रश्न उद्भवत नाही. सद्य:स्थितीत सदर लांबीत काम भौतिकदृष्टया पूर्ण आहे.
(४) व (५) कामाची किंमत (स्वीकृत निविदा किमत व अधिकचा खर्च जीएसटी वगळून ) एकूण ९५२.९४ लक्ष असून काम पूर्ण झालेले आहे व ठेकेदारास सदर कामापोटी आज रोजीपर्यंत रु. ८४१.७१ लक्ष (जीसएटी वगळून) किंमतीचे देयक पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अदा करण्यात आले आहेत. सदरचे काम सद्य:स्थितीत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत भौतिकदृष्टया पूर्ण करण्यात आले आहे.

---

## परभणी जिल्ह्यात जिंतूर नगर परिषद पाणीपुरवठ्याचे बंद असलेले फिल्टर सुरू करण्यासाठी लाखो रुपयांचा खर्च केल्याबाबत

**(६) ३७६४८ (२०-०४-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील जिंतूर नगरपरिषदेला तालुक्यातील येलदरी धरणातून पाणीपुरवठा केला जात असून सदर पाणीपुरवठा योजना अपुरी पडत असल्याने काही वर्षापूर्वी नवीन योजना लाखो रुपये खर्च करुन मंजूर करण्यात आली असून, सदर पाइपलाईनची मोठ्या प्रमाणात नासधूस झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुन्हा शहराला पाणीपुरवठा कमी पडत असल्याने चार वर्षांपूर्वी ३२ कोटी रुपयांची योजना मंजूर झाली असून, सदर योजनेचे काम अत्यंत संथगतीने चालू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेसाठी फिल्टर सुरु करण्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करुन तसेच नियमांची पायमल्ली करण्यात येऊन, काम पूर्ण झाल्यावर निविदा, कार्यालयीन अंदाजपत्रक तयार केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत रुपये २४.९१ कोटी किंमतीच्या जिंतूर शहर पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली असून दिनांक ०७ मार्च, २०१९ रोजी सदर प्रकल्पाचे कार्यादेश देण्यात आलेले असून कोव्हीड काळात मजूर उपलब्ध नसल्याने कंत्राटदारास मुदतवाढ देण्यात आली होती.

सद्यस्थितीस प्रकल्पाची भौतिक प्रगती ७२ % झालेली असून डिसेंबर, २०२३ पर्यंत प्रकल्पाचे काम पूर्ण करून प्रकल्प कार्यान्वित करण्याचे नियोजन असल्याचे मुख्याधिकारी, जिंतूर नगरपरिषद यांनी कळविले आहे.
(३) व (४) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर जिंतूर नगरपरिषद पाणीपुरवठा प्रकल्पातील १०.५ एम.एल.डी. क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्राचे काम पूर्ण झालेले नसल्यामुळे जुन्या जलशुद्धीकरण केंद्राची साफसफाई व डागडुजी नगरपरिषद कर्माचाऱ्यांमार्फत करण्यात आली. नवीन जलशुद्धीकरण केंद्राकरिता अंथरण्यात आलेली पाईपलाईन जुन्या जलशुद्धीकरण केंद्रास जोडण्यात आली. नवीन जलशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित होईपर्यंत पाण्याची समस्या सोडविण्यासाठी नगरपरिषद स्तरावर तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे.

जुन्या जलशुद्धीकरण केंद्राची डागडुजी करताना नगरपरिषदमार्फत कुठलाही खर्च करण्यात आलेला नाही व त्यासंदर्भात कुठलीही निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही असे मुख्याधिकारी, जिंतूर नगरपरिषद यांनी कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई येथील विमानतळाला देण्याबाबत

**(७) ३७७०१ (०९-०४-२०२२). श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई येथील प्रस्तावित विमानतळाला जोपर्यंत दि.बा.पाटील यांचे नाव दिले जात नाही, तोपर्यंत लढा सुरूच राहील अशी स्थानिक भूमिपुत्र परिषदेने घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विमानतळाचे काम बंद करण्याचा इशाराही दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक भूमिपुत्र परिषदेने विमानतळाच्या ठिकाणी झालेल्या भूमिपुत्र परिषदेत दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिकांच्या या प्रश्नाविषयीच्या भावना विचारात घेता या विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव देण्याच्या दृष्टीने शासनाचे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-११-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) नवी मुंबई येथील विमानतळ नामकरणाच्या प्रस्तावास मा. मंत्रिमंडळाच्या दि.१६.०७.२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आली आहे. तद्नंतर सन-२०२२ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये दि.२५.०८.२०२२ रोजी

विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये (विधानसभा / विधानपरिषद) महाराष्ट्र विधानसभा नियम ११० अन्वये व महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०६ अन्वये मांडलेला शासकीय ठराव मंजूर करण्यात आला. यासंदर्भातील शिफारशींसह प्रस्ताव केंद्र शासनाच्या नागरी विमान मंत्रालयाकडे दि.७.१०.२०२२ रोजी पाठविण्यात आलेला आहे.

---

**भटटीचामाळ (ता.श्रीवर्धन, जि.रायगड ) येथील मत्स्यशेतीमुळे परिसरातील शेतीचे होत असलेले नुकसान**

**(८) ३८१९३ (०९-०४-२०२२). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भट्टीचामाळ (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथील श्री.सुभाष अंजर्लेकर यांच्या गट क्रमांक १०४ मधील शेतीमध्ये एस अँग्री या कंपनीमार्फत मत्स्यशेती तसेच ग्रुप ग्रामपंचायत भोस्ते हददीतील (ता.श्रीवर्धन जि.रायगड) येथील रहिवाशी श्री.मधुकर महादेव गोगरकर यांच्या गट क्रमांक १०३/२७७ मधील शेतीलगत कोलंबी प्रकल्पाची तलावे असून येथे खारे पाणी भरुन मत्स्यशेती केली जात असल्याने परिसरातील विहिरीतील पाणी खारे होऊन शेतीचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.मधुकर महादेव गोगरकर यांच्या गट क्रमांक १०३/२७७ मधील शेतीलगत सर्व कोलंबी माशांची शेती जवळच्या पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोत्राजवळ असल्याने शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान होऊन विहिरीचे पाणीदेखील खारे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील तलावात जनावरे पाणी पिण्याकरिता येत असल्याने जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-१२-२०२२) :** (१) मत्स्य व्यवसाय विभागाकडून प्राप्त अहवालानुसार श्री. सुभाष आंजर्लेकर यांना गट क्र.१०४ मधील विनापरवानगी मत्स्य संवर्धन प्रकल्प त्वरीत बंद करण्याबाबत दि.२३.११.२०२१ रोजी लेखी नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुषंगाने त्यांनी सदर प्रकल्प बंद करून जमीन सपाट करीत असल्याचे कळविले आहे.

(२), (३) व (४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून गट क्र.१०३/२७७ मधील शेतीतील विहिरीच्या पाण्याच्या नमून्याचे पृथ:करण केले असता विहिरीच्या पाण्यातील काही घटक विहित मर्यादेत आहेत. परंतू सदरची विहिर ही मत्स्य शेतीजवळ असल्याने पाणी खारे होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सीआरझेड मर्यादा रद्द होऊनही आराखड्याअभावी मुंबईतील अनेक पुनर्विकास प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(९) ३८४१६ (०९-०४-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सागरी हद्द नियंत्रण कायदा भरती रेषापासून ५० मीटरवर लागू करण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली असतानाही राज्य शासनाने संबंधित आराखडा मंजूर न केल्यामुळे समुद्र किनारी असलेले मुंबईतील अनेक पुनर्विकास प्रकल्प प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पांना दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंत लागू असलेल्या चटई क्षेत्रफळ अधिमुल्य सवलतीचा लाभही घेता आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने हलगर्जीपणा करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करुन संबंधित आराखडा तातडीने मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-१२-२०२२) :** (१) केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी सि. आर. झेड. अधिसुचना, २०१९ अतंर्गत मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयांसाठी सिआरझेड आराखडा दि. २९.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये मंजुर झाला असुन सदर नकाशे एमसीझेडएमए च्या संकेतस्थळावर प्रसिध्य करण्यात आलेले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेची अंमलबजावणी करणेबाबत

**(१०) ३९९४५ (०९-०४-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीतील भूमिहीनांना जमीन उपलब्ध करुन त्यांचे सबलीकरण करणे आणि त्यांना स्वाभिमानाने जगता यावे, यासाठी कर्मवारी दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना सुरु करण्यात आली. परंतु या योजनेतून गेल्या १५ वर्षात राज्यभरातील फक्त ५५०० कुटूंबातील लाभार्थ्यांना लाभ मिळाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेची गती वाढवून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा, यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही,

(२) सदर योजनेचा प्रचार व प्रसार स्थानिक वृत्तपत्रातून करण्याबाबत वेळोवेळी क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते. सदर योजनेंतर्गतच्या लाभार्थ्यांना कागदपत्रे प्राप्त करुन घेण्यात येणाऱ्या अडचणीच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकारी यांना सेतूमार्फत आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याबाबत कळविलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विक्रोळी (पुर्व) रेल्वे स्थानालगत असलेल्या मार्गाचे रूंदीकरण व अतिक्रमीत झोपडया निष्कासनाची कार्यवाही न करणाऱ्या प्रशासनावर कारवाई करण्याबाबत

**(११) ३९९९१ (१९-०४-२०२२). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी (पुर्व) रेल्वे स्थानालगत असलेल्या (नामदेव पाटणे मार्ग) मार्गाचे रूंदीकरण आणि एमयुटीपी प्रकल्पात बाधितांचे पुनर्वसन झाल्यानंतरही बाधित उक्त ठिकाणी झोपड्या बांधत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी केलेले अतिक्रमण हटविण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी मध्य रेल्वे विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व महापालिका यांची संयुक्त बैठक घेण्याची विनंती प्राधिकरणाकडे वारंवार करुनही सदर प्रकरणी कार्यवाही होत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने सदर मार्गाचे रूंदीकरण व अतिक्रमीत झोपडयावर निष्कासनाची कार्यवाही न करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच पुनर्वसन होऊनही अतिक्रमित केलेल्या झोपड्याचे निष्कासन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी बाधित झालेल्या १७ अनिवासी बांधकामांचे एमएमआरडीएमार्फत पुनर्वसन करण्यात आले होते. तथापि पुनर्वसन करूनही सदर जागी पुन्हा अतिक्रमण केलेल्या १७ अनिवासी बांधकामांचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासन करण्यात आले आहे.

तसेच नामदेव पाटणे मार्ग हा १८.३० मीटर रुंद विकास नियोजन रस्ता असल्याकारणाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रूंदीकरणाबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### सडक-अर्जुनी (जि.गोंदिया) राका येथील चुलबंद नदीवरील कोल्हापुरी बंधाऱ्याला कठडे बांधण्याबाबत

**(१२) ४०९३० (३०-०३-२०२२). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सडक-अर्जुनी (जि.गोंदिया) राका येथील चुलबंद नदीवरील कोल्हापुरी बंधाऱ्याला कठडे नसल्याने अपघात होत असल्याने सदरील कोल्हापूरी बंधाऱ्याला कठडे बांधण्यासाठी नागरिकांनी मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील मागणीनुसार चुलबंद नदीवरील कोल्हापूरी बंधाऱ्याला कठडे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) चुलबंद नदीवरील कोल्हापूरी बंधाऱ्यावर कठडे बांधकाम करण्याबाबतचे अंदाजपत्रक जिल्हा नियोजन समिती, गोंदिया यांना दिनांक ०४/०७/२०२२ रोजी सादर करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती जिल्ह्यातील समाजकल्याण विभागामार्फत सुरु असलेल्या वसतीतिगृहांवरील सुरक्षारक्षकांचे मानधन थकित असल्याबाबत

**(१३) ४१४०७ (०९-०४-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील समाजकल्याण विभागामार्फत सुरु असलेल्या मुला/मुलींचे वसतीगृह, निवासी आश्रमशाळांवर सन २०१३ पासून क्रिस्ट्ल कंपनीमार्फत कार्यरत असलेल्या सुरक्षारक्षकांचे मानधन माहे एप्रिल, २०२१ पासून कंपनीकडे थकीत असल्याचे माहे फेब्रुवारी २०२२ च्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर सुरक्षारक्षकांचे मानधन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-११-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सबंधित सुरक्षारक्षकांचे माहे एप्रिल, २०२१ पासून थकीत असलेले मानधन अदा करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्हा परिषदेतील समाज कल्याण विभागात आंतरजातीय विवाह प्रोत्साहन अनुदान चुकीच्या रितीने वाटप झाल्याबाबत**

**(१४) ४१८०९ (०९-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद जळगाव सन २०१७-२०१८ मध्ये आंतरजातीय विवाह प्रोत्साहन ४८ जोडप्यांना रु. ५०,०००/- प्रमाणे रु. २४,००,०००/- अनुदान देण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ४८ जोडप्यापैकी श्री.आशिष सुतार हे मध्यप्रदेश रहिवाशी असून श्री.महेंद्र गीर गोसावी यांनी महाराष्ट्र बाहेर लग्न केले तसेच पंकज म्हस्के हे नवरा बायको एकाच प्रवर्गाचे असून देखील त्यांना आंतरजातीय विवाह प्रोत्साहन देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने चुकीच्या पध्दतीने प्रोत्साहन अनुदान वाटप करण्यात आल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने चुकीच्या रितीने देण्यात आलेल्या प्रोत्साहन अनुदान वाटपात संबधित दोषी आढळलेल्या व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कुळगाव बदलापूर नगरपरिषद क्षेत्रातील बेलवली कात्रप रेल्वे ओव्हर ब्रिज (आर.ओ.बी.) च्या बांधकामाबाबत**

**(१५) ४२३६६ (२५-०४-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत एम.एम.आर. क्षेत्रातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद क्षेत्रातील बेलवली कात्रप रेल्वे ओव्हर ब्रिज (आर.ओ.बी.) च्या बांधकाम करण्यासाठी दि.१३ फेब्रुवारी, २०१९ रोजी तसेच नेवाळी नाका येथे भुयारी मार्गाचे बांधकाम करणे या कामास दि.७ ऑगस्ट, २०१९ रोजी मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मा.नगरविकास मंत्री महोदयांना बैठक आयोजित करण्यासाठी अनेकवेळा पत्र देवुनही बैठक आयोजित करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-११-२०२२) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) व (४) रेल्वे उड्डाणपूलासाठीच्या अधिग्रहणाची प्रक्रिया स्थानिक स्वराज्य संस्थेकडून प्रलंबित राहिल्याने शासनाचे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी सदरील प्रकल्पास स्थगिती देणे आवश्यक होते, तसेच नेवाळी येथील भुयारी मार्गाच्या मार्गिकेत मेट्रोच्या प्रकल्पाची मार्गिका येत असल्याने सद्य:स्थितीत सदरील चौकात वाहतूक सिग्नल यंत्रणेद्वारे वाहतूक नियंत्रण करणे शक्य आहे असे अभ्यासाअंती दिसून आले. त्यामुळे सदरचे काम दि.२९/१२/२०२० रोजी रद्द केले आहे.

---

**राज्यात रमाई आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजनांतर्गत शहरी भागांमध्ये व ग्रामीण भागांमध्ये देण्यात येणाऱ्या अनुदानात तफावत असल्याबाबत**

**(१६) ४२६३१ (०९-०४-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रमाई आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना या योजनांतर्गत शहरी भागांमध्ये व ग्रामीण भागांमध्ये देण्यात येत असलेल्या अनुदानात तफावत असल्याची बाब माहे जानेवारी २०२२ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरी भागामध्ये ज्याप्रकारे घरांचे बांधकाम करण्यासाठी जेवढा खर्च येतो त्याचप्रकारचा खर्च ग्रामीण भागातही येत असल्यामुळे घरकुल योजनेच्या अनुदानात वाढ करण्याची मागणी अकोला जिल्ह्यातील विविध गावांधील सरपंच, सभापती व गटविकास अधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांना लेखी निवेदनाद्ववारे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार घरकुल योजनेच्या अनुदानात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

या योजनेंतर्गत ग्रामीण भागासाठी रू.१.३२ लक्ष, डोंगराळ/नक्षलग्रस्त भागासाठी रू.१.४२ लक्ष व शहरी भागासाठी रू.२.५० लक्ष इतके अनुदान दिले जाते. रमाई आवास योजना ही केंद्रीय पंतप्रधान आवास योजनेच्या धर्तीवर राबविण्यात येते. केंद्र शासनाने सदर योजनेच्या अनुदानात वाढ केल्यास त्याप्रमाणे शासन स्तरावर याबाबत उचित निर्णय घेतला जाईल.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील दलित वस्तीचे नव्याने सर्वेक्षण करण्याबाबत**

**(१७) ४३८१० (०१-०४-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महापालिकेअंतर्गत नव्याने झालेल्या दलित वस्तीचा सर्व्हे न झाल्याने सदर भागात विकास कामे करण्यास अनेक अडचणी येत असल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा नव्याने झालेल्या दलित वस्तींचा सर्व्हे करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील दलित वस्तीचे नव्याने सर्वेक्षण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-११-२०२२) :** (१) अशा आशयाची मागणी महानगरपालिकेस प्राप्त झाली नाही. तसेच, दलित वस्ती भागात विकास कामे करण्यास अडचणी येतात, ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही.

(२) व (३) सन २०११ च्या जनगणनेनुसार ज्या प्रभागात दलित वस्ती आहे अथवा अनुसूचित जाती व नवबौध्द यांची लोकसंख्या ५०% पेक्षा अधिक आहे, अशा वस्त्यांमध्ये नागरी सुविधा विषयक कामे हाती घेण्याबाबत दि.०५.०३.२००२ च्या शासन निर्णयामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने अनुसूचित जाती व नवबौध्द यांचेसाठी राखीव असलेल्या प्रभागामध्ये नागरिकांचे प्रमाण जेथे तुलनेने अधिक असेल, तेथे प्राधान्याने योजनेअंतर्गतची अनुज्ञेय कामे हाती घेण्यात येतात. त्यामुळे नव्याने सर्वे करण्याची आवश्यकता दिसून येत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नऱ्हे, धायरी, शिवणे, खेड शिवापूर व शिंदेवाडी (ता.हवेली,जि.पुणे) गावातील अनधिकृत कंपन्यांमुळे होत असलेले प्रदूषण

**(१८) ४४७९६ (१७-०९-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नऱ्हे, धायरी, शिवणे, खेड शिवापूर व शिंदेवाडी (ता.हवेली,जि.पुणे) या गावांमध्ये अनधिकृतपणे सुरु असलेल्या केमिकल, कलर व खाद्यपदार्थ-बेकरी उत्पादित कंपन्यांमुळे प्रदूषणात वाढ झाली असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांमध्ये बेकायदेशीरपणे प्रदूषण निर्माण करणारे उद्योग सुरु असल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्हयातील बंद दगडखाणी सुरु करण्याबाबत

**(१९) ४४९६७ (१७-०९-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील शेकडो दगडखाणींना पर्यावरण विभागाचा ना-हरकत दाखला दिला नसल्यामुळे गत काही वर्षांपासून सदर खाणी बंद असून त्यांची तपासणी वन विभाग व सिडको यांच्यावतीने करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबतचा तपासणी अहवाल तयार करुन संयुक्तपणे निर्णय घेण्यास विलंब होत असल्याने दगडखाणींचे भवितव्य अधांतरी असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बंद असलेल्या दगडखाणी सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सिडकोच्या ताब्यातील दगडखाणींचे वन विभाग, सिडको व जिल्हा खनिकर्म अधिकारी, ठाणे यांच्यावतीने तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ मुल्यांकन समिती –१ (SEAC – १) कडे सादर करण्यात आला आहे.

त्यानुषंगाने सिडकोच्या ताब्यातील ठाणे जिल्ह्यातील दगडखाणींचे ५१ प्रस्ताव राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ मुल्यांकन समिती – १ च्या दिनांक १३/०९/२०२२ ते दिनांक १६/०९/२०२२ रोजी आयोजित २२८ व्या बैठकीमध्ये चर्चेला ठेवण्यात आले असून सदर प्रकरणाबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील भटक्या कुत्र्यांची संख्या वाढल्याने नागरिकांच्या संरक्षणासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(२०) ४५०४४ (२१-०९-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत भटक्या कुत्र्यांची संख्या जवळपास ३ लाखावर गेली असून ४ वर्षात सुमारे ३ लाख नागरीकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याचे महानगरपालिकेच्या आकडेवारीवरुन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईच्या संरक्षणासाठी एक महालक्ष्मी येथे, दुसरे पश्चिम उपनगरात वांद्रे, तीसरे मालाड व पूर्व उपनगरातील मुलुंड या चार ठिकाणी विभागनिहाय केवळ ४ डॉग स्कॉड उपलब्ध असून सदर यंत्रणेच्या कमतरतेमुळे नागरिकांना भटक्या कुत्र्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे या श्वानांचा उपद्रव रोखण्यास महानगरपालिकेला संपूर्णतः अपयश आल्याने सकाळी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थी, कामगार तसेच रात्रपाळीहून येणार नागरिक यांच्या सुरक्षिततेची व आरोग्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करुन नागरिकांच्या प्रभावी संरक्षणाच्यादृष्टीने डॉग स्कॉडची यंत्रणा वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सन २०१८ ते माहे मे, २०२२ पर्यंत श्वानांनी चावा घेतल्याच्या ३,०७,६५२ इतक्या नोंदी आहेत. तथापि, श्वानांनी चावा घेतल्याच्या पश्चात रेबीज लसीकरण बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १४७ लसीकरण केंद्रांवर करण्यात येते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या श्वानांची संख्या नियंत्रित ठेवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सन १९९४ पासून श्वान निर्बीजीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

सदर कार्यक्रमांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सन १९९४ ते माहे मे, २०२२ पर्यंत एकूण ३,८३,४२९ भटक्या श्वानांच्या निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

तसेच, भटक्या श्वानांच्या तक्रारींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात श्वान नियंत्रण विभागांतर्गत मस्जिद बंदर, मुलुंड, वांद्रे व मालाड या ठिकाणी श्वान अनुज्ञापन आस्थापना कार्यरत आहेत.

त्याचप्रमाणे, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या श्वानांचे दरवर्षी रेबीज लसीकरण करणे, तसेच श्वान निर्बिजीकरण व रेबीज लसीकरण कार्यक्रमांत अधिकाधिक संस्थांचा सहभाग वाढविण्याकरिता प्रयत्न सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील धरणांच्या प्रलंबित कामांबाबत**

**(२१) ४५३७७ (१२-१०-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील धरणांच्या प्रलंबित कामांबाबत जलसंधारण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मंत्रालयामध्ये बैठक झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुहागर मतदार क्षेत्रातील लघुपाटबंधारे योजनांच्या कामांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १०/१२/२०२० आणि दिनांक १५/०५/२०२१ रोजी मा. मंत्री, जलसंधारण यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पत्रांतील नमूद कामांना मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-११-२०२२) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. गुहागर मतदारसंघातील लघुपाटबंधारे योजनांच्या कामांबाबत मा.विधानसभा सदस्य यांनी दिनांक १०/१२/२०२० रोजी मा.मंत्री (मृद व जलसंधारण) महोदयांना निवेदन सादर केलेले आहे.

(३) मौजे गुणदे व पोसरे, ता.खेड या योजनेच्या पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्रस्तावासाठी आवश्यक सल्लामसलत शुल्क रु.७.७० लक्ष रक्कमेची मागणी दि.१६/०६/२०२२ रोजी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडे सादर करण्यात आलेली आहे. मौजे निवे, ता.खेड या योजनेचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्रस्ताव तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. मौजे काडवली, ता.खेड या योजनेची रद्द करण्यात आलेली निविदा प्रक्रिया पुन्हा सुरु करण्याचे नियोजन आहे. मौजे मुसाड, ता.खेड या योजनेस महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडून रु.३२०५.६१ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता दि.२०/०१/२०२१ रोजी प्रदान करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ( MMRDA) च्या माध्यमातून वरळी ते शिवडी उन्नत मार्गाचे खोदकाम करतांना जुन्या उपकरप्राप्त इमारतींचे नुकसान झाल्याबाबत

**(२२) ४५४८५ (२७-०९-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ( MMRDA) च्या माध्यमातून वरळी ते शिवडी उन्नत मार्गाचे काम करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यासाठी खांब उभारताना करण्यात आलेल्या खोदकामांमुळे शिवडी, परळ, प्रभादेवी येथील जुन्या उपकरप्राप्त इमारतींचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतींना खोदकाम करतांना बसणाऱ्या हादऱ्यांमुळे इमारत कोसळून जीवितहानी होण्याची भीती स्थानिक नागरिकांच्या मनात निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) हे खरे नाही,

(३), (४) व (५) अंशत: हे खरे आहे,

सदर प्रकल्पाचे फाऊंडेशनचे खोदकाम करत असताना स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरीकांकडून रस्त्यालगतच्या इमारतींना धोका पोहचू शकतो अशा आशयाची निवेदने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास प्राप्त झाली आहेत.

प्रस्तुत प्रकरणी शिवडी येथील बस आगार ते राष्ट्रीय हॉटेल या भागातील इमारतींच्या जवळील दोन्ही बाजूच्या पदपथाच्या कडेलगत पोर्टल प्रकाराने प्रस्तावित केलेले मूळ फाऊंडेशनचे काम इमारतीपासून सुरक्षित अंतर ठेवून रस्त्याच्या मध्यरेषेवर करण्यात येत आहे, तसेच उन्नत मार्गाच्या संपूर्ण लांबीमध्ये रस्त्यालगत असलेल्या कोणत्याही इमारतींना धोका होणार नाही याबाबतची संपुर्ण खबरदारी घेऊनच काम करण्याच्या सूचना प्रकल्प सल्लागार व कंत्राटदार यांना प्राधिकरणामार्फत देण्यात आल्या आहेत.

---

**मिरा-भाईंदर (जि.ठाणे) शहरातील धोकादायक इमारतीबाबत**

**(२३) ४५५११ (२८-०९-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) शहरातील धोकादायक इमारतीचा प्रश्न दिवसेंदिवस वाढत असल्याने, पावसाळयापूर्वी केलेल्या सर्वेक्षणात शहरात एकूण ३३२ इमारती धोकादायक म्हणून घोषित केल्या असून महापालिकेने सर्व जुन्या इमारतींना स्ट्रक्चरल ऑडीट करण्याच्या नोटीस दिल्या असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी ३१६ इमारती दुरुस्तीयोग्य असून केवळ १६ इमारतीच अतिधोकादायक असल्याने रिकाम्या करुन तातडीने जमीनदोस्त कराव्या लागणार आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शहरातील अशा धोकादायक इमारतीचे ऑडीट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच ऑडीट नुसार धोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांचे पुनर्वसन तातडीने करण्याबाबत तसेच दुरुस्तीयोग्य इमारती तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने वा महानगरपालिकेने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक स्थितीत असलेल्या इमारतींवर कारवाई करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६४ अन्वये संबंधित सहायक आयुक्त यांना पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे.

प्रथमदर्शनी धोकादायक वाटणाऱ्या इमारतींची पाहणी करणे, संरचनात्मक तपासणी व टेस्टींग करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६५अ अन्वये बांधकाम अभियंत्याचे पॅनल तयार करण्यात आलेले आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे-२०२२ मध्ये सी-२ ए प्रवर्गातील इमारत रिकामी करून, दुरूस्ती करणे योग्य एकूण १४ इमारती आहेत.

सी-२बी, प्रवर्गात रिकामी न करता दुरूस्ती करणे योग्य २८९ इमारती आहेत. तसेच, सी-३ प्रवर्गात इमारतींची किरकोळ दुरूस्ती करणे योग्य १३ इमारती आहेत.

सी-१ प्रवर्गात एकूण १६ इमारती राहण्यास अयोग्य अतिधोकादायक म्हणून घोषित केलेल्या आहेत. आतापर्यंत एकूण २४ इमारती राहण्यास अयोग्य अतिधोकादायक म्हणून घोषित केलेल्या आहेत. त्यापैकी ११ इमारती निष्कासित केल्या असून, ५५ इमारतींवर मा. न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेले आहेत. उर्वरित ८ इमारतींवर कारवाई प्रस्तावित आहे.

भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजनेमधून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून महानगरपालिकेस सदनिका प्राप्त झाल्या असून, सदर सदनिकांमध्ये धोकादायक इमारतीमधील १५० रहिवाशांना तात्पुरत्या स्वरूपात सदनिका उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दादासाहेब गायकवाड स्वावलंबन व सबलीकरण योजनेस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२४) ४५७१० (२३-०९-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन. २००४-०५ पासून अनुसूचित जाती, नवबौध्दांसाठी दादासाहेब गायकवाड स्वावलंबन व सबलीकरण योजना कार्यान्वित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या तीन वर्षात सदर योजनेला निधी नसल्यामुळे भूमीहीनांना जमिनीचे वाटप थांबले असून बीड जिल्ह्यात या योजनेखाली २५० प्रकरणे निधीअभावी प्रलंबित असून गेल्या काही वर्षापासून लाभार्थ्यांची निवड करून जमीन वाटप झालेली नाही व सदर योजनेच्या प्रगतीची अदययावत माहिती शासनाने संकलित केलेली नाही. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनुसूचित जाती, नवबौध्दांसाठी कार्यान्वित दादासाहेब गायकवाड स्वावलंबन व सबलीकरण योजनेला तातडीने निधी उपलब्ध करून देऊन पात्र लाभार्थ्यांची निवड करून जमिनी वाटप करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून सदर योजनेला निधी मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे,
(२) हे खरे नाही, गेल्या ३ वर्षात म्हणजेच सन २०१९-२० ते २१-२२ या वर्षात सदर योजनेवर क्रमश: रूपये २८७०.०९ लक्ष, २५००.०० लक्ष व ५०००.०० लक्ष खर्च झालेला आहे. बीड जिल्ह्यात सदर योजनेवर सन २०१९-२० व २१-२२ या वर्षात क्रमश: रूपये ५०.९९ लक्ष व १०००.०० लक्ष खर्च झालेला असून सन २०२०-२१ या वर्षात COVID-१९ च्या प्रादुर्भावामुळे लॉकडॉऊनची परिस्थिती असल्याने पुरेसा निधी प्राप्त झालेला नाही. बीड जिल्ह्यात सन २०१८-१९ ते साधारणपणे सन २०२१-२२ पर्यंत सदर योजनेंतर्गत जमीन विक्रेत्याचे ७११ अर्ज प्राप्त झालेले असून सदर योजनेच्या उप समितीने ९५ अर्जातील १५७ एकर बागायत जमीन व २७ एकर जिरायत जमीन खरेदी योग्य आहे, अशा दिलेल्या अहवालातील ७० एकर बागायत जमीन खरेदी करण्यास सदर योजनेच्या जिल्हास्तरीय समितीने दिनांक २५ मे , २०२२ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे. मान्यता दिलेली जमीन खरेदीची पुढील प्रक्रिया राबवून पात्र लाभार्थ्यास लवकरात लवकर जमीन वाटप करण्यात येईल.
(३) हे खरे आहे, प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने औरंगाबाद प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण विभागास आवश्यक कार्यवाही करण्यास व निधी मागणी नोंदविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.
(४) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध झालेला निधी त्या त्या प्रमाणात वितरीत करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या नस्त्या व कागदपत्रे गहाळ झाल्याबाबत

**(२५) ४५७९६ (२५-०९-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहिती व जनसंपर्क संचालनालयाचे तत्कालीन संचालक श्री.अजय अंबेकर यांच्या कार्यकाळातील ई-ग्रंथालयाची निर्मिती, मिडिया मॉनेटरिंग सेंटरची निर्मिती व कामकाज, प्रशिक्षण दौरे व कार्यशाळा, संवादकारी स्टुडिओचे अद्ययावतीकरण इत्यादींच्या नस्त्या व कागदपत्रे गहाळ झाले असल्याचे व उपलब्ध नस्त्यांमध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता असल्याचे निदशर्नास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याचप्रमाणे पदोन्नती, तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, बिंदू नामावली, पदांचा आढावा अशा दाव्यांकडे अक्षम्य दुर्लक्ष केल्याने विभागाच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांचा नैसर्गिक न्याय डावलण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचा तपशील काय आहे व त्याअनुषंगाने तत्कालीन संचालकाविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-१२-२०२२) :** (१) माहिती व जनसंपर्क संचालनालयाचे तत्कालीन संचालक श्री. अजय अंबेकर यांच्या कार्यकाळातील स्टुडीओचे अद्ययावतीकरण ही नस्ती वगळता इतर सर्व विषयांशी संबंधित नस्त्या कार्यालयात उपलब्ध आहेत. सदरहू नस्त्यांमध्ये कोणतीही प्रशासकीय तसेच वित्तीय अनियमितता झाली असल्याची बाब अद्याप निदर्शनास आलेली नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर व बुलढाणा शहरात जडवाहतुकीमुळे वाहतुक कोंडी व अपघातात वाढ होत असल्याबाबत**

**(२६) ४६००८ (१७-०९-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: सोलापूर, बुलढाणा येथील जडवाहतूक बंदीचा कालावधी संपल्यानंतरही शहरातून मोठ्या प्रमाणात जड वाहतूक होत असल्याने शहरात सर्वत्र वाहतुक कोंडी व अपघाताचे प्रमाण वाढल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर व मेहकर शहरांमध्ये वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी तयार करण्यात आलेल्या बायपास मार्गाचा वापर न करता वाहनचालक आरटीओच्या संगनमताने शहरातून जडवाहतूकीच्या घटना वारंवार घडत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर शहराच्या मध्यवर्ती रस्त्यावरुन होणारी वाहतुक बंद करुन कायमस्वरुपी शहरा बाहेरुन वळविणे तसेच मेहकर शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्याकरिता व आरटीओच्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-११-२०२२) :** (१) दिनांक २४.०५.२०२२ रोजी दैनिक सकाळ, सोलापूर शहर वृत्तपत्रामध्ये या बाबतची बातमी प्रसिध्द झाली आहे.

(२), (३) व (४) सोलापूर शहरातील मध्यवर्ती रस्त्यावरून होणारी जड वाहतूक बंद करणेविषयी पोलीस आयुक्त, सोलापूर (शहर) यांनी दि.१३.१०.२०१८ पासून आदेश जारी केले आहेत.

जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या दिनांक ०५.०७.२०२२ रोजीच्या आदेशानुसार सकाळी ५.०० वाजता ते रात्री १२.०० वाजेपर्यंत मेहकर शहरात जड वाहनांना बंदी करण्यात आली आहे.

---

**राज्यातील रस्ते अपघातात वाढ होत असल्याबाबत**

**(२७) ४६०२५ (१६-०९-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाहनांची संख्या वाढत असताना माहे जानेवारी,२०२२ ते एप्रिल, २०२२ या कालावधीत १९,३८६ अपघात होऊन त्यामध्ये ५३३३ जणांचा दुर्देवी मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,नाशिक जिल्ह्यात २०२१ मध्ये सर्वाधिक ३४२ अपघाती मृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रस्त्यावरील व महामार्गावर होणाऱ्या अपघातांवर नियंत्रण आणण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-११-२०२२) :** (१) होय.

(२) नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागात सन २०२१ मध्ये ८६२ तर नाशिक शहरी भागात १८१ एवढे अपघाती मृत्यू झाले आहेत.

(३) अ) रस्त्यावरील वाढत्या अपघातांवर प्रतिबंध आणण्यासाठी पोलीस विभाग तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या अधिनस्त असलेल्या अंमलबजावणी पथकामार्फत नियमित तपासणी होऊन वाहन चालक यांचे वाहतुक नियम पाळण्याबाबत प्रबोधन करण्यात येते. तसेच मोटार वाहन कायद्यातील तरतुदींचे वाहन चालकांकडून उल्लंघन होत असल्यास अशा वाहन चालकांवर गुन्हे नोंदविण्यात येतात.

ब) नाशिक जिल्ह्यामधील अपघाती मृत्यू संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी पथदर्शी प्रकल्पाअंतर्गत जागतिक बँकेने (World Bank) नाशिकमधील सुमारे ५०० कि.मी. रस्त्याची निवड करुन त्याबाबतचा अहवाल तयार केला आहे. या अहवालानुसार अपघातांसंदर्भात उपाययोजना करणेसंबंधी परिवहन आयुक्त कार्यालयाकडून दिनांक २७.०१.२०२२ च्या पत्राद्वारे संबंधित विभागांना सुचना देण्यात आल्या आहेत.

क) परिवहन विभागामार्फत प्रत्येक जिल्हयामध्ये प्राणंतिक व गंभीर स्वरुपाच्या अपघातांमध्ये वाहन स्थळांची व वाहनांची तपासणी करण्यासाठी एक अपघात तपास पथक नेमुन त्यांना २ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येते. त्यानुसार नाशिक विभागातील नाशिक, धुळे, मालेगाव, अहमदनगर, श्रीरामपूर, जळगाव, नंदुरबार जिल्हयातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी यांना दि.२४.०९.२०२२ व दि.२५.०९.२०२२ रोजी प्रशिक्षण देण्यात आले आहे.

ड) शासन अधिसूचना दि. १३.०५.२०१५ रोजीच्या अधिसुचनेनुसार नाशिक जिल्हयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा रस्ता सुरक्षा समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोणार (जि.बुलढाणा) बसस्थानकांमधील गैरसोयींबाबत

**(२८) ४६०३९ (१७-०९-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील लोणार सरोवर जागतिक पर्यटन स्थळ असून लोणार बसस्थानकांमध्ये अनेक समस्या असून पर्यटकांना नेहमीच अडचणीचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बसस्थानकांतील गैरसोयी तातडीने दूर करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-१०-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

बुलढाणा जिल्हयातील लोणार बसस्थानकाच्या आधुनिकीकरण व दर्जावाढ करणे हे काम पुर्ण करण्यात आलेले आहे. सदर बसस्थानकावर प्रवांशाकरिता आसन व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था प्रसाधनगृहांची व्यवस्था, प्रवाशी प्रतिक्षालयात फॅन, लाईट, इत्यादीची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच चालक वाहक विश्रांती गृह महिला विश्रांती गृह, हिरकणी कक्ष, स्थानक प्रमुख कक्ष, चौकशी कक्ष, आदि व्यवस्था करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेहकर (जि.बुलढाणा) येथील नविन बसस्थानकाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२९) ४६०४२ (१७-०९-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) शहरातील नविन बस स्थानकाच्या बांधकामाकरिता सव्वा तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर असतांनाही सदर बांधकाम मागील तीन वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कामे तातडीने सुरुवात न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा माहे एप्रिल, २०२२ रोजीच्या सुमारास दिला आहे, हे खरे आहे काय

(३) असल्यास, या नविन बस स्थानकांचे काम प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-१०-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे,
माहे मे २०२२ च्या अखेरीस आम आदमी पार्टी यांचेकडून आंदोलनाबाबतचे पत्र रा.प.महामंडळाच्या बुलढाणा विभागास मिळाले आहे.
(३) व (४) रा.प.मेहकर बसस्थानकाच्या बांधकामाचा कार्यादेश दि.३१.०८.२०१९ रोजी देण्यात आलेला होता. माहे मार्च, २०२० ते सन २०२१ या कालावधीत कोरोना या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे व माहे नोव्हेंबर, २०२१ ते माहे एप्रिल,२०२२ या काळावधीत कर्मचारी संप असल्याकारणाने काम सुरू करता आले नाही. बसस्थानकासाठी बांधकाम परवानगी ही माहे जून,२०२२ मध्ये प्राप्त झाली. त्यानंतर सदर बसस्थानकाचे काम सुरु करण्यात आले असून सद्यस्थितीमध्ये बसस्थानकाचे काम प्लिंथ लेवल पर्यत झाले आहे.

---

**हिंगणा ( जि. नागपूर) दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत ग्रामपंचायत माहुरझरी येथे समाजभवनाचे बांधकाम करण्याबाबत.**

**(३०) ४६१५७ (२५-०९-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा (जि.नागपूर) येथील दलितवस्ती सुधार योजनेअंतर्गत ग्रामपंचायत माहुरझरी येथे समाजभवन बांधकाम करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मे २०२२ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांना लेखी निवेदन देवूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार समाजभवन बांधकामाच्या प्रस्तावास तातडीने मंजुरी देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-११-२०२२) :** (१) होय,
(२) व (३) सन २०२२-२३ ते २०२६-२७ या कालावधीचा पंचवार्षिक बृहतआराखडा तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून सदर बृहतआराखडा तयार होताच श्री. समिर मेघे, विधानसभा सदस्य (स्थानिक लोकप्रतिनिधी) यांच्या प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने माहुरझरी ग्रामपंचायतीकडून मागविण्यात आलेला प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर समाज भवन बांधकामाच्या मंजुरीबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

---

**विरार (पुर्व) (ता.वसई, जि.पालघर) येथिल जलकुंभ बांधकामाच्या स्फोटांमुळे घरांचे झालेले नुकसान**

**(३१) ४६३०७ (२८-०९-२०२२). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील विरार पुर्वेच्या कशिद कोपर या भागात मुंबई महानगर विकास प्राधिकरण (MMRDA) यांच्या मार्फत उभारण्यात येत असलेला जलकुंभ बांधकामाच्या स्फोटांमुळे स्थानिकांच्या घरांना हादरे बसुन मोठ्या प्रमाणात घरांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक १४ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलकुंभ उभारणीसाठी होत असलेल्या उत्खननामुळे भूस्खलन होऊन ही गावे ढिगाऱ्याखाली जाण्याची भीती नागरीकांनी व्यक्त केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने भविष्यात दुर्घटना व जीवीतहानी होऊ नये याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-११-२०२२) :** (१) हे, खरे नाही.
(२), (३) व (४) याबाबत स्थानिकांच्या तक्रारी एमएमआरडीएकडे प्राप्त झाल्या आहेत.
याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कामाची सखोल पाहणी केली असून, सदर ठिकाणी भूगर्भामध्ये कठीण खडक असल्यामुळे भुस्खलनाची शक्यता नसल्याचा, तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून भविष्यात दुर्घटना व जिवीतहानी होण्याची शक्यता नसल्याचा निष्कर्ष काढला आहे.
तथापि, सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

- डोंगरावरील कार्यक्षेत्राच्या वरच्या भागावरील दगड, खडक वाहून जाऊ नयेत म्हणून उत्खननानंतर उतारांचे कायमस्वरुपी संरक्षण करण्यासाठी सॉईल नेलिंग करण्यात येत आहे.
- रस्त्याच्या बळकटीकरणासाठी अप्रोच रोडसाठी भराव करण्यात आलेली माती जीओ टेक्टाईल मॅटव्दारे संरक्षित करण्यात येत आहे.
- पावसाळयात पाण्याचा प्रवाह सुरक्षित राहण्यासाठी, कार्यक्षेत्राच्या बाजुला असलेले नैसर्गिक नाले सुरक्षित करण्यात आले आहेत.

---

### मुंबईतील मुलुंड पूर्व येथील नीलम नगर ते गव्हाणपाडा या रस्त्याच्या प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत

**(३२) ४६७४० (२२-०७-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या बॉटलनेक पॉलिसी नुसार विकास नियोजन आराखड्यात प्रस्तावित असलेल्या मुंबईतील मुलुंड पूर्व येथील नीलम नगर ते गव्हाणपाडा ६.१० मीटर रुंद रस्त्याचे EP-T५२/MT ६१/ ES ५४ ची मंजुरीचा प्रस्ताव नगर विकास विभागाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी मिळण्यास किती कालावधीत लागणार आहे ?
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) :** (१) ते (३) बृहन्मुंबई विकास योजना २०३४ मधील सारभुत स्वरुपाच्या फ़ेरबदल EP-T५२ बाबत शासनाने अंतीम निर्णय घेतला असुन त्यासंबधीत अधिसुचना दि.१२/०९/२०२२ रोजी निर्गमित केली आहे. त्यामुळे सदरचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित नाही.

---

### राज्यातील ‘जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी’ यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३३) ४६७४५ (२८-१०-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २३ जिल्ह्यात ‘जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी’ हे पद रिक्त असल्याचे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पदाचा पदभार उपजिल्हाधिकारी यांच्याकडे दिला असल्याने पूर्ण वेळ जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत राज्यातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-११-२०२२) :** (१) होय.

(२) होय.

रिक्त असलेल्या जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी या पदांचा अतिरिक्त कार्यभार उपजिल्हाधिकारी/ निवासी उपजिल्हाधिकारी यांचेकडे सोपविलेला आहे.

(३) राज्यातील सदर रिक्त पदांवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या पात्र उमेदवारांच्या नियुक्तीची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील राज्य परिवहन मंडळाच्या बस आगाराच्या नुतनीकरणाबाबत**

**(३४) ४७११४ (१७-०९-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील राज्य परिवहन मंडळाच्या गेल्या अनेक वर्षापासून प्रतिक्षेत असलेल्या बस आगाराच्या नुतनीकरणाचे काम अद्यापपर्यंत सुरू झाले नसल्याने चालक, वाहक व प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे जून, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचा विकास करार दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी करण्यात आला असून विकासकाव्दारे प्रकल्पाचे नकाशे पनवेल महानगरपालिकेत सादर केले असून नकाशांना महानगरपालिकेकडून मान्यता मिळाल्यानंतर सदर प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मागील अनेक वर्षापासून पनवेल आगाराचे प्रलंबित काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२२) :** (१), (२), (३) व (४) सन २०१९ मध्ये पनवेल बसस्थानक/ आगाराचे नकाशे ले आऊट मंजूरीकरीता जुन्या U D C P R नियमावलीप्रमाणे पनवेल महानगरपालिकेस सादर केले. परतू दरम्यानच्या काळात नविन विकास नियमावली जाहीर झाल्याने पनवेल महानगरपालिकेने सदर नकाशांची तांत्रिक छाननी केली असता नवीन U D C P R प्रमाणे सुधारीत नकाशे बनविणेबाबत पनवेल महानगरपालिकेकडून सूचित करण्यात आले होते. त्यानुसार नवीन नकाशे विकासकाकडून बनविण्यात आले आहे. सदर नकाशे अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**पुणे जिल्ह्यात सदोष बॅटऱ्यांमुळे ईलेक्ट्रीक वाहनांना लागत असलेली आग**

**(३५) ४७१४३ (१७-०९-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात सदोष बॅटऱ्यांमुळे ईलेक्ट्रीक वाहनांना आग लागण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संरक्षण, संशोधन व विकास संस्थेच्या (डी.आर.डी.ओ.) स्फोटके व पर्यावरण सुरक्षा प्रयोग शाळेने ईलेक्ट्रिक वाहनांना लागणाऱ्या आगीच्या घटनांचा चौकशी करुन निष्कर्ष काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदोष बॅटऱ्या तसेच कंपनीच्या मान्यतेशिवाय डीलरकडून वाहनामध्ये परस्पर करण्यात येणारे बदल यामुळे सदर घटना सातत्याने घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच इलेक्ट्रिक वाहनांच्या संख्येच्या तुलनेत व्यापारी तत्वावर चार्जिंग स्टेशन उभारण्यास शासनाकडून परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(५) असल्यास, प्रस्तुत प्रकरणांची चौकशी करुन नागरीकांच्या जिवीतास धोका निर्माण करणाऱ्या सदोष उत्पादक कंपन्या व विनापरवानगी बदल करणारे डिलर यांचेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-११-२०२२) :** (१) दिनांक २१.०७.२०२२ व दि. २०.०७.२०२२ रोजी दैनिक लोकमत मधील हॅलो पुणे ग्रामिणच्या आवृत्तीत अशा आशयाच्या बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत.
(२) प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे कार्यालयाने दिनांक २७.१०.२०२२ रोजी संरक्षण, संशोधन व विकास संस्थेच्या (डी.आर.डी.ओ.) नाशिक यांचेकडे विचारणा केली असता सदर संस्थेने दिनांक २८.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये ACEM is not involved in any electric battery related research, and hence, no inputs are available असे कळविले आहे.
(३) दि. १८.०७.२०२२ रोजी मे. देवाल रायडर्स, गंगाधाम, पुणे या शोरुमध्ये ई-बाईकला आग लागल्याची घटना घडल्यानंतर प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांचे अधिनस्त मोटार वाहन निरिक्षक यांनी दि. २१.०७.२०२२ रोजी सदर शोरुमला भेट दिली व त्या अनुषंगाने त्यांनी सादर केलेल्या अहवालात सदर घटना सदोष बॅटरीमूळे अथवा डिलरकडून वाहनात परस्पर बदल केल्यामुळे घडली याबाबत ठाम निष्कर्ष काढता येत नाही असे नमूद केले आहे.
(४) शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय विभाग यांनी दि. २३.०७.२०२१ नुसार महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण-२०२१ जारी केले आहे.
(५) केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १२६ मध्ये नमूद केलेल्या मान्यता प्राप्त तपासणी संस्थाकडून वाहनांना Type Approval मिळाल्यानंतरच अशा वाहनांना विक्री करण्याची परवानगी आहे व या संस्थांद्वारे प्रमाणीत वाहनांचीच नोंदणी करण्यात येते.
विहित वेग मर्यादेपेक्षा जास्त वेग असणाऱ्या ईलेक्ट्रीक बाईक्सवर प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांच्या वायुवेग पथकामार्फत मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली असून या कारवाई मध्ये रस्त्यावरील एकूण १६ ई-बाईक्स आणि डिलरच्या शोरुम मधील एकूण ९ ई-बाईक्सवर कारवाई केली आहे. रस्त्यावर कारवाई करण्यात आलेल्या एकूण १६ वाहनांपैकी ७ वाहनांकडून तडजोड शुल्क रु. ४९२५०/- व डिलर शोरुमधील ९ वाहनांपैकी १ वाहनधारकाकडून रु ७२५०/- इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दहिगाव रेचा (ता. अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती) येथील पुरसंरक्षक भिंत दुरुस्तीच्या कामास निधी उपलब्ध करून देणेबाबत**

**(३६) ४७१८६ (०९-१०-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहिगाव रेचा (ता. अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती) हे गांव बोरडी नदीच्या काठावर असून या नदीच्या काठांव सावरपाणी लघुसिंचन प्रकल्पाचे हस्तांतरण जलसंपदा विभागामार्फत मृद व जलसंधारण विभागास झालेले असून दिनांक २२ जुलै २०२१ रोजी वा त्या सुमारास अतिवृष्टीमुळे सदर प्रकल्पाची नदीकाठावरील पुरसंरक्षण भिंत फुटल्याने संपूर्ण गावात पुराचे पाणी शिरून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या पुरसंरक्षण भिंतीची दुरुस्ती व नदी पात्राचे खोलीकरणांसाह रुंदीकरण करण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेअंतर्गत शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुरसंरक्षण भिंत दुरुस्तीच्या कामास निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-११-२०२२) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) पुरसंरक्षक भिंतींच्या दुरुस्तीचा प्रस्ताव दिनांक २३/०६/२०२२ रोजी जिल्हा नियोजन समिती, अमरावती यांना सादर करण्यात आलेला आहे. तसेच पुरसंरक्षक भिंत फुटल्याने झालेल्या नुकसानीबाबतचा मदत व पुर्नवसन विभागास पाठविण्यासाठीचा प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाने दिनांक ०५/०७/२०२२ रोजी अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, नागपूर यांना सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाची छाननी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील दादर येथिल टिळक पूल, रे रोड आणि भायखळा या पुलांची पुनर्बांधणी प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) ४७३६० (२५-०९-२०२२). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दादर येथिल टिळक पूल, रे रोड आणि भायखळा या तब्बल १०० वर्षांपूर्वीच्या पुलांची पुनर्बांधणी प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सर्व पुलांचे आयुर्मान पूर्ण झाले असतानाही या पुलांच्या खर्चाचा निधी मंजूर झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू महत्त्वाच्या पुलांच्या खर्चाला स्थायी समितीची मंजुरी अद्याप न मिळण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या पुलांची पुनर्बांधणी तातडीने सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) :** (१), (२), (३) व (४) मुंबईतील दादर टिळक, रे रोड आणि भायखळा या पुलांच्या पुनर्बांधणीकरिता रेल्वे प्रशासनाच्या शिफारशीनुसार एम.आर.आय.डी.सी.एल. (महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. या संस्थेची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नेमणुक करण्यात आली आहे.

सदर ३ पूल व इतर ९ पुलांच्या पुनर्बांधणीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात रु. २०० कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली असून, सदर अर्थसंकल्पीय तरतुदीकरिता स्थायी समितीची मंजुरी प्राप्त आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**वांगरी (ता.बार्शी, जि.सोलापूर) ग्रामीण रुग्णालय व सांगोला बसस्थानकाच्या आवारातील प्रसाधनगृहाबाबत**

**(३८) ४७५६३ (१७-०९-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील सांगोला बस स्थानक आवारात लाखो रुपये खर्चुन बांधण्यात आलेले महिलांसाठीचे प्रसाधनगृह बंद असल्याने महिला प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे कोकण, कोल्हापूर, मिरज, सांगली, औरंगाबाद, सोलापूर, परभणी, बीड, नांदेड, पुणे, मराठवाडा तसेच कर्नाटक व गोवा या शेजारील राज्यांमधून येणाऱ्या महिला प्रवाशांची गैरसोय होत असतानाही परीवहन महामंडळ याकडे दुर्लक्ष करीत असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महिला प्रवाशांची गैरसोय दूर करुन सांगोला बस स्थानक आवारातील बंद असलेले प्रसाधनगृह सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२२) :** (१) व (२) नाही.

सांगोला बसस्थानकात स्थानिक खासदार निधीतुन बांधण्यात आलेले व नवयुवक मेहतर समाज पर्यावरण व ग्रामीण विकास संस्था लातुर महाराष्ट्र या संस्थेने "बांधा, वापरा व हस्तांतरित करा" या तत्वावर बांधण्यात आलेले असे दोन्ही प्रसाधनगृहाचे वापर महिला प्रवाशांसाठी चालु असल्याने महिला प्रवाशांची कोणतीही गैरसोय होत नाही.

(३) व (४)प्रश्न उद्भवत नाही.

---

### कळंब (ता.कळंब जि.यवतमाळ) बस स्थानकातील गैरसोईबाबत

**(३९) ४७६९९ (१७-०९-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथे श्री चितामणी गणपती मंदीर देवस्थान असून येथील बस स्थानकात शौचालय तसेच इतर सोईसुविधा उपलब्ध नसल्याने भाविक तसेच नागरीकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे परिवहन विभागामार्फत माहे मार्च, २०१९ मध्ये नवीन बस थाब्यांच्या बांधकामाकरिता निधी मंजूर करण्यात येवूनही यवतमाळ विभागाकडून बस थाब्यांच्या बाधकामासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिनाक २४ जुन, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-१०-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विटा (जि. सांगली) बस स्थानकाची झालेली दुरवस्था

**(४०) ४७७४२ (१७-०९-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा (जि. सांगली) येथील बसस्थानकाची दुरवस्था झाल्याने प्रवाशांचे हाल होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, विटा बसस्थानकांत प्रवाशांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-१०-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही,

(३) विटा बसस्थनकावरील वाहनतळाचे कॉंक्रीटीकरण करणे, डांबरीकरण करणे तसेच बसस्थानकावरील मागणीनुसार वाहनतळाची पिण्याच्या पाण्याच्या टाकीची व प्रसाधनगृहाची किरकोळ दुरुस्ती रा.प. महामंडळाकडून करण्यात आली असून बसस्थानकावर बांधीव टाकी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रवाशी प्रसाधनगृह सुस्थितीत आहे.

विटा बसस्थानकावर प्रवाशांच्या सोयी करीता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, उपहारगृह, हिरकणी कक्ष, पार्सल, प्रवाशी प्रतिक्षालय, वाहनळ इ.सोयी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) येथे आगाराच्या नवीन इमारत बांधकामासह सोयी सुविधा पुरविण्याबाबत**

**(४१) ४७७७७ (१७-०९-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) येथे सन १९८५ मध्ये बांधण्यात आलेल्या बस स्थानकाची दुरावस्था झाल्याने सदर बस स्थानकाची इमारत पाडून नवीन इमारतीचे बांधकाम व वाहनतळ विकसित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ मे, २०२२ रोजी मा.परिवहन मंत्री यांना निवेदनाव्दारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१२-२०२२) :** (१) होय. सदर निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) मलकापूर (जि.बुलढाणा) येथील बसस्थानकाची पुनर्बांधणी करण्याच्या कामास प्रशासकिय मान्यता दिलेली असून सदरच्या कामासाठी वास्तुविशारद यांची नेमणुक करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा व शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील मानव विकास योजनेअंतर्गत सुरु असलेल्या बसेसच्या संख्येत वाढ करण्याबाबत**

**(४२) ४८०९९ (१९-०९-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा व शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील अनेक गावांमध्ये माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षणाच्या सुविधा नसल्याने तेथील विद्यार्थ्यांना परिवहन महामंडळाच्या बसने तालुका मुख्यालयी ये-जा करावी लागत असून गत अनेक महिन्यापासून (कमी उत्पन्न) भारमानाअभावी एस.टी. सेवा बंद केली असल्याने तसेच विद्यार्थ्यांकरिता वाडा व शहापूर तालुक्यात सुरु असलेल्या मानवविकास योजनेच्या बसगाडयांची संख्या कमी असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वाडा व शहापूर तालुक्यातील मानव विकास योजनेअंतर्गत सुरु असलेल्या बसेसच्या संख्येत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२२) :** (१) नाही.

शहापुर व वाडा आगाराकडुन सद्यस्थितीत ग्रामीण भागातील शाळेच्या विद्यार्थ्यांना तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी ये-जा करण्याकरिता रा.प.शहापुर व वाडा आगाराकडून प्रतिदिन ०७ मानवविकास बसेसद्वारे अनुक्रमे १३४ व १५६ फे-या चालनात आहेत. आगाराकडून कमी भारमानाअभावी फे-या स्थगित करण्यात आलेल्या नाहीत. जेणे करुन विद्यार्थी व ग्रामीण भागातील प्रवाशांची कोणतीही गैरसोय होणार नाही याबाबत रा.प. महामंडळ दक्षता घेत आहे.

(२) महाराष्ट्र राज्य शासनाकडुन ग्रामीण भागातील मुलींना मानवविकास योजनेअंतर्गत गांव ते शाळा मोफत प्रवास उपलब्ध करणेकरिता रा.प.शहापुर आगारास ०७ व रा.प.वाडा आगारास ०७ बसेस मंजुर असून सदर सर्व बसेस दोन्ही आगारातून तालुका गटशिक्षणाधिकारी यांचेकडुन दिलेल्या नियोजनाप्रमाणे शाळेच्या वेळेनुसार मानव विकास फे-या सुरू आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लेंडी (ता.नांदगांव, जि.नाशिक) नदीपात्रातील अतिक्रमणामुळे परिसरातील नागरीकांचे झालेले नुकसान**

**(४३) ४८२६० (२८-०९-२०२२). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लेंडी (ता.नांदगांव, जि.नाशिक) नदी पात्रालगत राहणाऱ्या चांडल प्लॉट, जयभोले नगर, करीम चाळ या भागातील रहिवाशांना नदीला पाणी आल्यावर दळणवळणासाठी रस्ता राहत नसल्याने या परिसरात पूल बांधणे, नदीपात्राला समांतर रस्ता तयार करणे, भूमिगत गटारी इत्यादी प्रमुख मागण्यांसह विविध मागण्यासाठी नागरीकांनी नांदगाव नगरपरिषदेसमोर दिनांक १७ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास उपोषण सुरु केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षी लेंडी नदीपात्रातील अतिक्रमणामुळे उक्त परिसरातील नागरीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा त्या करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) लेंडी नदीपात्रालगतच्या अतिक्रमणाची माहिती संकलित करुन पुराच्या पाण्याच्या प्रवाहास अडथळा ठरणारी सर्व अतिक्रमणे पुराचे पाणी कमी झाल्यानंतर कोणताही विलंब न करता नांदगाव नगरपरिषदेमार्फत दि.१८ मे, २०२२ रोजी काढण्यात आली आहेत.

तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांनी लेंडी नदीचे खोलीकरण व नदीच्या लांबीला संरक्षित करणे या कामाकरीता श्री.मंदार श्रीकृष्ण रत्नपारखी यांना दि.२६ ऑगस्ट, २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चामोर्शी (जि.गढचिरोली) येथील बस स्थानकाच्या बांधकामास निधी उपलब्ध करून देणेबाबत**

**(४४) ४८३३७ (२०-०९-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चामोर्शी (जि.गडचिरोली) येथील बस स्थानकाच्या बांधकामास शासनाने ३ कोटी रुपये मंजूर करण्यात येऊनही सदर निधी न मिळाल्याने बस स्थानकाचे बांधकाम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी उपलब्ध करुन बस स्थानकाचे बांधकाम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२२) :** (१) व (२) चामोर्शी बस स्थानकाच्या बांधकामासाठी वास्तुविशारदांची नियुक्ती करण्यात आली आहे.नकाशे तयार करुन मध्यवर्ती कार्यालयास सादर करण्यात आले असून नकाशांची तपासणीची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी निजामपूर (जि.ठाणे ) शहर महानगरपालिका हद्दीत अनधिकृत शाळा सुरु असल्याबाबत**

**(४५) ४८५०६ (२८-०९-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी निजामपूर (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीमध्ये २६ शाळा शासनाच्या विनापरवानगीने चालविण्यात येत असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-११-२०२२) :** (१), (२) व (३) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या ३० शाळा या अनधिकृत असल्याची बाब जिल्हापरिषद, ठाणे यांनी दिनांक २८.०४.२०२२ च्या पत्रान्वये भिवंडी महानगरपालिकेस कळविली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेमार्फत उपरोक्त शाळांची पडताळणी केली असता, सदर शाळांपैकी ०२ शाळा कोरोना काळात बंद झाल्या आहेत व ०२ शाळांना शासनाची मान्यता मिळालेली आहे. तथापि, उर्वरीत २६ शाळांना महानगरपालिकेकडून नोटीस बजाविण्यात आली आहे. सदर शाळांची यादी प्रसिध्द करुन सदर शाळेत विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नये असे पालकांना महानगरपालिकेने आवाहन केले आहे.

उपरोक्त २६ पैकी ०२ शाळा या सद्यस्थितीत बंद करण्यात आल्या आहेत. इतर २४ शाळांच्या बाबतीत महानगरपालिकेकडून जिल्हापरिषद, ठाणे यांच्यासोबत पत्र व्यवहार सुरू आहे. तथापि, जिल्हापरिषद, ठाणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानंतर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल असे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**पुणे येथील चक्राकार (पश्चिम)मार्गासाठी होणाऱ्या भूसंपादनाबाबत**

**(४६) ४८८७३ (२१-०९-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील चक्राकार (पश्चिम) मार्गासाठी येथील भोर तालुक्यातील सुमारे ७ गावे, मुळशी तालुक्यातील १४ गावे व हवेली तालुक्यातील ९ गांवे आणि मावळ तालुक्यातील ६ गावांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे गावातील बागायती व जिरायती क्षेत्र संपादीत होणार असल्याने लोकामध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शासनाने या रिंगरोडची आखणी करतांना कमीत कमी शेतजमीन, इमारती बाधित होतील व जास्तीत जास्त पडीक जमिनीचा वापर होईल याबाबत नियोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-११-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पुणे येथील चक्राकार (पश्चिम) मार्गासाठी भोर, तालुक्यातील ५ गावे, मुळशी तालुक्यातील १५ गावे आणि हवेली तालुक्यातील ११ गावे व मावळ तालुक्यातील ६ गावांचा समावेश आहे.
(२) हे ही अंशत: खरे आहे.

पुणे (पश्चिम) चक्राकार मार्गाची आखणी करताना कमीत कमी बागायती क्षेत्राचे संपादन होईल, याचा विचार करण्यात आलेला आहे.
(३) पुणे रिंगरोडची आखणी करताना कमीत कमी शेतजमीन, इमारती बाधीत होतील व जास्तीत जास्त पडीक जमिनीचा वापर होईल याची दक्षता घेऊनच प्रकल्प आखणी करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर, वेल्हे व मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील बंद असलेल्या एसटी फेऱ्या पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(४७) ४८९७४ (२०-०९-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर, वेल्हे व मुळशी (जि.पुणे) या तीनही तालुक्यातील शेवटच्या टोकापर्यंत मुक्कामी जाणाऱ्या एसटी महामंडळाच्या कोरोना काळात बंद झालेल्या बस फेऱ्या अद्याप सुरु झालेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे येथे दररोज किमान एक मुक्कामी बसची फेरी करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभाग, पुणे यांना दि.२ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने निर्णय घेवून उपरोक्त तीनही तालुक्यातील एसटीच्या मुक्कामी फेऱ्या सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सदरचे पत्र प्राप्त झाले आहे.
भोर, वेल्हे व मुळशी (जि.पुणे) या तिनही तालुक्यामध्ये एसटी बसच्या २३ ग्रामीण मुक्कामी फे-या सुरू करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोविड – १९ मध्ये कर्तव्य बजावत असताना मृत्यू झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटुंबियांना प्राधान्याने अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेबाबत

**(४८) ४९०४२ (२५-०९-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोविड–१९ मध्ये कर्तव्य बजावत असताना मृत्यू झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटुंबियांना प्राधान्याने अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याबाबतची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या किती व त्यांच्या कुटुंबियांना नोकरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कोविड-१९ मध्ये कर्तव्य बजावत असताना मृत्यू झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांची विभागीय आयुक्त कार्यालयांनी महसूल विभागनिहाय उपलब्ध करुन दिलेल्या आकडेवारीनुसार कोविड-१९ मुळे गट-अ ते गट-ड मधील ४३० अधिकारी/कर्मचारी यांचे निधन झाले आहे. त्यामधील ३८३ कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांनी अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज केला असून त्यापैकी ९३ उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या सहायक आयुक्त (वॉर्ड ऑफिसर) बृहन्मुंबई महानगरपालिका, वरिष्ठ सेवा गट-अ या पदांच्या परिक्षा पुनश्च घेण्याबाबत

**(४९) ४९०६४ (२५-०९-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहायक आयुक्त (वॉर्ड ऑफिसर) बृहन्मुंबई महानगरपालिका, वरिष्ठ सेवा गट-अ या १६ पदांच्या पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून देण्यात आलेल्या जाहिरातीत आर्थिक दुर्बल घटकांकरीता (EWS) असणारी ५ वर्षे वयोमर्यादेची अट सदरील जाहिरातीत नमूद नसल्याने वय वर्षे ४० ते ४५ वयोगटातील अधिकारी / उमेद्वारांना सदरील परिक्षेपासून वंचित रहावे लागले असल्याची बाब माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी सन २०२१ मध्ये झालेल्या राज्य सेवा पूर्व परिक्षा व अवर सचिव (विधी) गट-अ या जाहिरातीमध्ये सुध्दा आयोगाकडून मुळ जाहिरातीमध्ये आर्थिक दुर्बल घटकांकरीता शुध्दीपत्रक काढून आर्थिक दुर्बल घटकांमधील उमेद्वारांकरीता ५ वर्षे वयाची वयोमर्यादा शिथील करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या परिक्षेमध्ये जवळपास ४३/१०० प्रश्नांबाबत अधिकारी व उमेदवारांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे आक्षेप नोंदविलेला आहे, हे खरे आहे काय,
(४) सन २००८, २०११ व २०१७ या वर्षी आयोगाने घेतलेल्या सदरील परीक्षेच्या जाहिरात व परिक्षेमध्ये जवळपास आठ ते दहा महिन्यांचा कालावधी होता, परंतु सन २०२१ मध्ये आयोगाकडून घेतलेल्या सदरील परिक्षेसाठी केवळ चार महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सहायक आयुक्त (वॉर्ड ऑफिसर) बृहन्मुंबई महानगरपालिका, वरिष्ठ सेवा गट-अ-२०२१ या १६ पदांच्या पदांकरीता आर्थिक दुर्बल घटकांमधील उमेद्वारांकरीता ५ वर्षे वयोमर्यादा शिथील करण्याच्या दृष्टीने कार्यवाही झालेली नसल्याने तसेच परीक्षेसाठी अत्यंत कमी कालावधी देण्यात आल्याने सदर परीक्षा पुन्हा घेण्याबाबत आयोगास निवेदने प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, त्यानुषंगाने पुन्हा परीक्षा घेण्याबाबत आयोगाची कोणती भूमिका आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
उत्तरतालिका प्रसिध्द केल्या नंतर एकूण १०० पैकी ६४ प्रश्नांवर उमेदवारांच्या तक्रारी आयोगास प्राप्त झाल्या होत्या.
(४) हे खरे नाही.
उपरोक्त परीक्षेच्या जाहिरातीचा दिनांक व चाळणी परीक्षेचा दिनांक या दरम्यानचा कालावधी अनुक्रमे ४,२ व ६ महिने असा आहे.
(५) हे खरे नाही.
(६) सदर पदाच्या चाळणी परीक्षेचा निकाल दि.२३.०३.२०२२ रोजी आयोगाकडून जाहिर करण्यात आला आहे. त्यामुळे परीक्षा पुनश्च: घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि. बीड) कृषि उत्पन्न बाजार समितीवर कार्यरत अशासकीय प्रशासक मंडळाची मुदत संपूनही प्रशासक यांची नियुक्ती न केल्याबाबत**

**(५०) ४९१७० (१७-०८-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये सद्यस्थितीत कार्यरत असलेले सर्व संचालक मंडळे/अशासकीय प्रशासक मंडळे यांना उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांनी दिनांक २२ एप्रिल, २०२२ च्या पुढे मुदतवाढ देणे उचित होणार नाही, असे आदेश दिल्याचे निदर्शानास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ५९ मधील तरतूदी अन्वये प्राप्त अधिकारांनुसार शासनाने जिल्हा उप निबंधक यांनी संबंधित संचालक मंडळाची निवडणूक होऊन प्रत्यक्ष संचालक मंडळ कार्यरत होईपर्यंत तसेच दिनांक २२ एप्रिल, २०२२ पासून पुढील ०६ महिने यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत कृषी उत्पन्न बाजार समित्यांवर प्रशासक यांची नियुक्ती करण्यात यावी, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा एक वर्षापर्यंतचा मुदतवाढीचा वाढीव कालावधी पूर्ण झालेला नाही अशा बाजार समित्या वगळून प्रशासक नियुक्तीचे आदेश तात्काळ निर्गमित करण्याबाबत सहसंचालक (पणन), यांनी आदेश दिले आहेत. हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्या अनुषंगाने अंबाजोगाई, जि. बीड. कृषि उत्पन्न बाजार समितीवर अशासकीय, प्रशासकीय, मंडळ दि. ११ मे, २०२१ रोजी नियुक्त करण्यात आले असुन . मंडळाची मुदत संपलेली असुन त्यानुसार एक वर्ष कालावधी झालेल्या प्रशासकीय मंडळाच्या जागेवर प्रशासक नेमावेत असे आदेश पणन संचालक पुणे यांनी मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय याच्या आदेशानुसार काढले असुन अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समिती वरील अशासकीय प्रशासक मंडळ रद्द करून त्वरित प्रशासक नेमणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे सहकार व पणन मंत्री व जिल्हा उपनिबंधक, बीड. यांच्याकडे दि. १८ एप्रिल,२०२२ व दि. २४ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली होती हे खरे आहे काय,
(५) असल्यास पणन संचालक, पुणे. यांनी मुदत संपलेल्या बाजार समित्यावर तात्काळ प्रशासक नेमण्याचे स्पष्ट आदेश असतानाही जिल्हा उपनिबंधक, बीड यांनी कोणतीही कार्यवाही न करता पणन संचालक यांच्या कडे दिनांक २५ एप्रिल, २०२२ व १ जून, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शन जाणीवपुर्वक विलंब केल्याचे निदर्शानास आले हे ही , खरे आहे काय,
(६) असल्यास,याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२२) :** (१) होय.
(२) शासन आदेश दिनांक १९.०४.२०२२ अन्वये महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम १५(अ) मधील तरतूदीनुसार संबंधित जिल्हा उपनिबंधक यांनी संबंधित संचालक मंडळाची निवडणूक होऊन प्रत्यक्ष संचालक मंडळ कार्यरत होईपर्यंत किंवा दि.२२.४.२०२२ पासून पुढील ६ महिने यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत कृषि उत्पन्न बाजार समित्यांवर प्रशासक यांची नियुक्त करावी. तथापि, ज्या बाजार समित्यांचा १ वर्षा पर्यंतचा मुदतवाढीचा वाढीव कालावधी पूर्ण झालेला नाही अशा बाजार समित्या वगळून प्रशासक नियुक्तीचे आदेश तात्काळ निर्गमित करण्यात यावेत असे आदेश देण्यात आलेले आहेत.
(३) नाही,
यासंदर्भात दिनांक १९.०४.२०२२ रोजी शासनाने आदेश दिलेले आहेत.
(४) व (५) मा. श्रीमती नमिता अक्षय मुंदडा, विधानसभा सदस्य, केज यांनी दिनांक ०३.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कृषि उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई येथील कार्यरत अशासकीय प्रशासक मंडळ रद्द करणेबाबत विनंती केली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक २३.०९.२०२२ अन्वये शासन आदेश दिनांक १९.०४.२०२२ नुसार कार्यवाही करण्याबाबत पणन संचालक, यांना कळविण्यात आले होते. मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल याचिका क्र.८९३३/२०२२ व इतर याचिकामध्ये दिनांक ०७.०९.२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी दिनांक २२.०९.२०२२ रोजी कृषि उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई या बाजार समितीवर प्रशासकाची नियुक्ती केली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.